दै. पुण्यनगरी दि. 20/01/2022

# दुचाकी चोरटा जेरबंद



## पाच दुचाकी जप्त

**नांदेड/ प्रतिनिधी**

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीला गेलेल्या दुचाकीबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा पोलिसांनी तपास केला असता एका आरोपीचा शोध लागला. त्याच्याकडून ५ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

नांदेड शहरातील हिंगोली नाका दरवेशनगर राहाणारे व्यापारी मोहम्मद जफर मोहम्मद अफसर यांची दुचाकी नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतून नुकतीच चोरीला गेली होती. याबाबत त्यांनी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार गु.र.नं. ३१/२०२२ कलम ३७९ दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील चोरीला गेलेल्या दुचाकीचा तपास करण्याबाबत पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे,अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे,उपविभागीय पोलीस अधिकारी सिध्देश्वर भोरे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार पो.नि.अशोक घोरबांड यांनी तपास पथकातील अधिकारी संकेत दिघे व पोहेकॉ स्वामी, कन्हाळे, जाधव, मलदोडे,पवार यांना तपास करण्याचे आदेश दिले. या पथकाला एकाबाबत माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिस पथकाने दीपक गणेश नारागुंडे-२१ रा.यशवंत कॉलेज बाबानगर नांदेड, ह.मु.प्रसाद गार्डन जवळ **(पान ४ वर..)**

## दुचाकी चोरटा...

अहमदपूर जि.लातूर यास ताब्यात घेतले आणि त्याची कसून चौकशी केली असता त्याच्याकडे मोहम्मद जफर यांची चोरीला गेलेली दुचाकी क्रमांक एम.एच.२६बी.एम.-६८१७ किमंत २० हजार रुपये आढळून आली. तसेच अन्य ठिकाणाहून चोरलेल्या दुचाकी क्रमांक ए.पी.-१० एवी. ९०५८, ए.पी.-२५ एच.३२८९, एम.एच.२२-एल-३५१२, एम.एच.२६-ए.एक्स -८३४९ असा एकुण ९४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.